

मा. संचालक,
राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर
स.न.वि.वि.

आपल्या संशोधन केंद्राने मृग बहारातील डाळींब पिकावरील डाळींब पिकाचे तेल्याचे व्यवस्थापन याविषयीची विस्तार पुस्तिका क्र. - २०१३/१५ ही डाळींब शास्त्रज्ञांनी संशोधन करून तयार केली. व तेल्यारोगाच्या व्यवस्थापनाविषयीची संपूर्ण माहिती या पुस्तिकेद्वारे आमच्यासारख्या डाळिंब उत्पादकांना दिली त्याबद्दल प्रथमतः मनःपूर्वक आभार.

आमच्या बागेच्या आम्ही गेल्यावर्षी मृग बहार धरला होता. बागेमध्ये डाळींब पिकाची फळांची संख्या चांगली होती. व फळांची वाढपण चांगली होती. पण अंदाजे २०० ग्रॅमचे फळ <del>२००</del> हिरव्या कलरचे असताना फळांवर तेल्यारोगाचा प्रादुर्भाव झाला होता त्यामुळे फळांना तडे जात होते व फळे फुटत होते. त्यानंतर मी तेल्यारोगाविषयी अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. भीमोदयाच्या आमच्या नातेवाईक सूर्यवंशी सर यांच्याकडून राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राने संशोधित केलेली विस्तार पुस्तिका क्र. १५ मला मिळाली. पुस्तिकेतील तेलकट डागाच्या व्यवस्थापनाकरीता तातडीने करावयाच्या उपाययोजनांची सांगितलेल्या सर्व औषधांच्या फवारण्या घेतल्या. व त्यापुढे डाळिंबाच्या अवस्थेनुसार वेळापत्रकातील फवारण्या आम्ही घेतल्या. त्यामुळे तेल्यावर नियंत्रण आले. व प्रादुर्भाव झाल्यानंतरसुद्धा अनुमाने २ ते ३ महिने डाळिंबाची फळे झाडावर व्यवस्थितरित्या वाढली. व या माहितीमुळे खराब हवामान असूनसुद्धा तेल्यारोगाने या बहाराचे नुकसान झाले नाही. हे सर्व करत असताना संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांना कडून वेळोवेळी फोनद्वारे छाटणी विषयी व फवारण्याविषयी चांगली माहिती मिळाल्यामुळेच आम्हाला दुसऱ्या वर्षाची बाग असूनसुद्धा ८५८ झाडांपासून २८ टन उत्पादन घेता आले. जर हे वेळापत्रक आम्हाला मिळाले नसते किंवा शास्त्रज्ञांनी संशोधन केले नसते

तर तेल्यामुळे आमचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असते.

या वर्षी मि नोव्हेंबरला बागेला पाणी सोडले होते या बहारात आपल्या संशोधन केंद्राच्या विस्तार पुस्तिका क्र-5 नुसार फवारणीचे नियोजन केले तर तेल्यामुळे पुर्ण बागेत फक्त 15 K.g. डाळींब खराब झाले. व तेल्या रोग बऱ्यापैकी कमी जाणवतो. डाळींब संशोधन केंद्राने केलेल्या संशोधनामुळेच हे सर्व शक्य झाले. हे संशोधन नसते तर बागाच पुर्ण उजाड झाल्या असल्या व डाळींब उत्पादकांवर खुपच वाईट दिवस आले असते. डाळिंबाच्या बागेत फिरताना किंवा डाळिंब खाताना डाळिंब संशोधन केंद्राची इमारत डोळ्यासमोर दिसते व तेल्या रोगाचे वेळापत्रक डोळ्यासमोर दिसते.

डाळिंब संशोधन केंद्राने केलेल्या संशोधनामुळे आमच्यासारख्या डाळिंब उत्पादकांना धैर्य मिळाले व मोठ्या प्रमाणात फायदा झालेला दिसतो. त्यामुळे संशोधन केंद्राने केलेल्या कामागिरी बद्दल ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो/मानतो.

भिगवण या ठिकाणी डाळिंब पिकावरील व्याख्यान झाले त्यातही अशीच खुप महत्वपूर्ण माहिती मिळाली. बागेतील व्यवस्थापना विषयी बारिक-सारिक गोष्टींचे ज्ञान त्यामध्ये मला मिळाले त्यामुळे अशी व्याख्याने ठिकठिकाणी असावीत असे मला वाटते..

शास्त्रज्ञांनी केलेल्या वेळोवेळी मार्गदर्श-नामुळे मी त्यांचा ऋणी आहे.

पुनश्च! मी तुमच्या सर्वांच्या ऋणातच राहू इच्छितो.

आपला

मुळे विकास संपतराव
मु.पो. मुळेवाडी
ता.कर्जत जि.अ.नगर

मो.नं. 9604376251



